नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४१ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...



### सलग ४ पराभवानंतर मुंबईचा विजय

मुंबई (स. गांवकरी) : आयपीएल हंगामात सलग चार सामने गमावल्यानंतर मुंबई इंडियन्सने विजय मिळवला आहे. संघाने सोमवारी गुजरात टायटन्सवर ९९ धावांनी विजय नोंदवला. अहमदाबादमध्ये गुजरातने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबईने २० षटकांत ५ गडी गमावून १९९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, गुजरातचा संघ १५.५ षटकांत १०० धावांवर सर्वबाद झाला. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने पॉवरप्लेमध्ये ४८ धावा करताना ३ गडी गमावले. सलामीवीर क्विंटन डी कॉक १३ धावांवर, पदार्पण करणारा दानिश मलेव्हर २ धावांवर आणि नमन धीर ४५ धावांवर बाद झाले.

### हायकोर्टाचे न्यायाधीश बाजूला

लखनौ (स. गांवकरी) : काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या दुहेरी नागरिकत्वाच्या प्रकरणातून अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांनी स्वतःला वेगळे केले आहे. सोमवारी न्यायमूर्तींनी याचिकाकर्त्याच्या पोस्टमुळे नाराज होऊन हा निर्णय घेतला आहे. याचिकाकर्त्याने पोस्ट केले होते की, जर तुम्ही कोणाकडून पैसे घेतले असतील तर ते परत करा, अन्यथा तुम्हाला तुरुंगात जावे लागेल. मात्र, त्याने आपल्या पोस्टमध्ये न्यायमूर्तींचा उल्लेख केला नव्हता. खरं तर, १७ एप्रिल रोजी न्यायमूर्तींनी राहुल गांधींविरोधात एफआयआर नोंदवण्याचे आणि प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश दिले होते. दुसऱ्याच दिवशी आपला निर्णय बदलत त्यांनी म्हटले होते की, राहुल गांधींना नोटीस बजावल्याशिवाय निर्णय देणे योग्य नाही.

### विदर्भात पुन्हा उष्णतेची लाटेचा इशारा

मुंबई (स. गांवकरी) : राज्यात सध्या पश्चिमी विक्षोभाची (वादळाची) स्थिती असून अनेक भागात वादळी पाऊस आणि गारपिटीची नोंद होत आहे. तर अनेक विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात उष्णतेची लाटेसदृश्य परिस्थिती आहे यामुळे नागरिकांना तीव्र उन्हाचा सामना करावा लागत आहे. राज्यात सोमवारपासून पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव वाढला असला तरीही मध्य महाराष्ट्रमी, मराठवाडा आणि विदर्भात उकाडा कायम आहे. दरम्यान, पुढील चार दिवस विदर्भात उष्णतेची लाट सदृश्य परिस्थिती राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. यामुळे नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ होण्याची चिन्ह आहेत.

### 'आरटीई' प्रवेशांसाठी मुदतवाढ

पुणे (स. गांवकरी) : राज्यातील शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठीच्या प्रवेशप्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार आता ३० एप्रिलपर्यंत कागदपत्र पडताळणी करून प्रवेश घेता येणार आहे. दरम्यान, सोमवारी सायंकाळपर्यंत सुमारे ३९ हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित केले होते. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठीची आरटीई प्रवेशप्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा राज्यातील ८ हजार ७०१ शाळांमध्ये १ लाख १४ हजार ८२६ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या आहेत.

# रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य

## सरकारच्या निर्णयाविरोधात गुणरत्न सदावर्ते मैदानात, म्हणाले- कायद्यात भाषेची सक्ती नाही



मुंबई : (स. गांवकरी)

राजधानी मुंबईत मराठी भाषेच्या मुद्द्यावरून राजकारण नेहमीच तापलेले असते, अशातच ज्या रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी लिहिता किंवा वाचता येत नाही, त्यांचे परवाने रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. येत्या 1 मे म्हणजेच महाराष्ट्र दिनापासून या निर्णयाची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले असून, मराठीच्या आग्रहासाठी घेतलेल्या या भूमिकेला आता विरोधही सुरू झाला आहे. रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष शशांक राव यांनी या निर्णयाला कडाडून विरोध दर्शवला असून, आता वकील गुणरत्न सदावर्ते यांनीही या वादात उडी घेतल्याने हा पेच अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गुणरत्न सदावर्ते यांनी आपल्या 'कष्टकरी जनसंघाच्या' माध्यमातून ट्रान्सपोर्ट कमिशनर कार्यालयावर धडक देत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्णयाचा तीव्र निषेध केला आणि संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. 1 मे हा दिवस महाराष्ट्र व देशभरात 'कामगार दिन' म्हणून साजरा केला जात असताना, रिक्षा व टॅक्सी चालकांवर कोणत्याही प्रकारचा मानसिक, सामाजिक किंवा प्रशासकीय दबाव आणणे चुकीचे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

अशा महत्त्वपूर्ण दिवशी कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणारी विधाने करणे हे बेकायदेशीर आणि संविधानविरोधी असल्याचे सांगत, सदावर्ते यांनी रॅपिडो व रिक्षाचालकांच्या वतीने आयुक्तांकडे या कामगारांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्याची मागणी केली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षाचालकांसाठी लागू केलेल्या मराठी सक्तीच्या निर्णयाला विविध कामगार संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला असून, भाषेच्या नावाखाली कामगारांना त्रास देणे हे संविधानाच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याची भूमिका मांडली आहे. भाषा हे दडपशाहीचे साधन न होता संवादाचे माध्यम असावे, असे मत व्यक्त करत ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या नेतृत्वाखाली रिक्षाचालकांनी ट्रान्सपोर्ट कमिशनर यांची भेट घेतली.

कोणत्याही चालकाला प्रशासनाकडून बेकायदेशीरपणे त्रास दिला जाणार नाही याची खात्री करणे ही प्रशासकीय जबाबदारी असल्याचे स्पष्ट करत, या निर्णयाविरोधात प्रशासनाकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले आहे.

### काय आहेत आंदोलकांच्या मागण्या?

मराठी भाषेच्या सक्तीवरून आंदोलकांनी प्रशासनासमोर आपल्या प्रमुख मागण्या मांडल्या असून, भाषेच्या नावाखाली केली जाणारी कोणतीही बेकायदेशीर कारवाई तातडीने थांबवण्यात यावी, अशी आग्रही भूमिका घेतली आहे. चालकांचे बॅज किंवा परवान्यांबाबत कोणतीही कारवाई करताना योग्य कायदेशीर प्रक्रियेचे पालन करावे आणि तसे स्पष्ट आदेश जारी करावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे. याशिवाय, प्रसारमाध्यमांमध्ये पसरणाऱ्या भ्रामक विधानांबाबत प्रशासनाने आपली अधिकृत भूमिका स्पष्ट करावी आणि आगामी 1 मे पासून कोणत्याही चालकावर अन्यायकारक किंवा बेकायदेशीर कारवाई होणार नाही, याची ठोस खात्री प्रशासनाने द्यावी, असेही या मागण्यांमध्ये नमूद करण्यात आले आहे.



# दबावाच्या राजकारणाला घाबरू नका

## शिंदे यांचा भाजपावर हल्लाबोल

सातारा : (स. गांवकरी)

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पातळी सोडून राजकारण करण्यात आले. कोणीही कितीही दबावाचे राजकारण करू द्या. पण तुम्ही घाबरू नका. निर्धाराने लढा असा आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपाचे नाव न घेता साताऱ्यातील सभेत दिला. सातारा येथील गांधी मैदानावरील सभेत उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार सुहास बाबर, संजीवराजे नाईक निंबाळकर, चंद्रहार पाटील, रवींद्र धंगेकर, शरद कणसे, चंद्रकांत जाधव, रेश्माताई जगताप, हनुमंतराव जगदाळे, योगेश जानकर अंकुश कदम आदी उपस्थित होते. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, नगराध्यक्ष, पालिका नगरसेवक आदी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. एकनाथ शिंदे यांच्या सभेस नुकत्याच झालेल्या सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीतील गोंधळाची पार्श्वभूमी होती. शिंदे म्हणाले, की सातारा ही माझ्यासाठी स्वाभिमानाची, शूर वीरांची भूमी आहे. मी उपमुख्यमंत्री म्हणून बोलत नाही तर सातारकर म्हणून बोलत आहे. सातारा हा एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. पण आता वेगळी 'काँग्रेस' असल्याचे सांगत त्यांनी नाव न घेता भाजपला टोला लगावला. नाव गेले की परत येत नाही. ते कमवायला फार कष्ट घ्यावे लागतात. तुम्ही मिळकत, संपत्ती, पैसा किती कमावली यापेक्षा माणसं किती कमावली. माणसांचे प्रेम किती कमावले हे महत्त्वाचं आहे. पण नुकत्याच झालेल्या येथील निवडणुकीत तुम्ही ते घालवलं. सातारच्या राजकीय परंपरेमध्ये खालच्या पातळीवरचे राजकारण केले. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष कोणी होऊ द्यात, पण लोकांच्या मनातला जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा शिवसेनेचाच आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

# आमची सर्व कागदपत्रे कायदेशीर; सगळे आरोप बिनबुडाचे

मुंबई : (स. गांवकरी)

ठाणे महानगरपालिकेच्या एमआयएम नगरसेविका सहर शेख यांच्या बोगस जात प्रमाणपत्र प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, गेल्या काही दिवसांपासून 'नॉट रिचेबल' असलेल्या सहर शेख यांनी अखेर समोर येत आपली बाजू मांडली आहे. मुंब्रा पोलिस ठाण्यात पोलिसांशी चर्चा केल्यानंतर "करारा जवाब मिलेगा" असा इशारा देणाऱ्या सहर शेख आणि त्यांचे वडील युनूस शेख यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी आपल्यावरील सर्व आरोप बिनबुडाचे असल्याचे सांगत, आमची सर्व कागदपत्रे कायदेशीर आणि खरी असल्याचा दावा केला असून विरोधकांना चोख प्रत्युत्तर देण्याची तयारी दर्शवली आहे. बनावट जात प्रमाणपत्र प्रकरणावरून गेल्या काही दिवसांपासून 'नॉट रिचेबल' असलेल्या एमआयएम नगरसेविका सहर शेख यांनी अखेर माध्यमांसमोर येत



आपली आक्रमक भूमिका स्पष्ट केली आहे. मीडियाकडून खोट्या बातम्या पसरवून घराघरात अफवा पोहोचवण्यात आल्या, त्यामुळे आता सत्य समोर आणण्याचा आम्हाला अधिकार आहे, असे म्हणत त्यांनी पत्रकारांनाच धारेवर धरले. उत्तर देण्यासाठी उशीर का झाला, हे ठरवण्याचा अधिकार माध्यमांना नसून तो आमचा वैयक्तिक प्रश्न असल्याचे त्यांनी सुनावले. तसेच, आपल्यावरील सर्व आरोप बिनबुडाचे असून अद्याप न्यायालयाने कोणताही निकाल दिला नसताना मीडिया आपल्याला दोषी कसे ठरवू शकते, असा संतप्त सवालही सहर शेख यांनी यावेळी उपस्थित केला.

# लॉजमध्ये विवस्त्र अवस्थेत आढळला तरुणीचा मृतदेह

## रायगड जिल्ह्यात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चव्हाट्यावर

अलिबाग : (स. गांवकरी)

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथे भरदिवसा एका लॉजमध्ये तरुणीची निर्घृण हत्या करण्यात आल्याने संपूर्ण परिसर हादरला आहे. या घटनेनंतर घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून गोरेगाव पोलीस आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. सोमवारी दुपारच्या सुमारास ही बाब उघडकीस आली. मुंबई गोवा महामार्गालगत लोणेरे इथं हा लॉज आहे. एक तरुण आणि एका तरुणीने लॉजमधील एक रूम भाड्याने घेतली. दुपारच्या सुमारास हा तरुण तिथून बेपत्ता झाला तर रक्ताच्या थारोळ्यात तरुणीचा नग्नावस्थेतील मृतदेह आढळून आला. या तरुणीच्या मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम सुरु असून या हत्याकांडातील संशयित फरार असल्याची प्राथमिक माहिती समोर येत



आहे. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी पाठवला आहे. दरम्यान या घटनेनंतर पोलिसांनी तपासाची सूत्रे हलवली आहेत. पोलिसांनी याबाबत लॉजच्या मालकाकडे चौकशी सुरू केली आहे. या तरुणीला लॉजवर घेवून जाणाऱ्या तरुणाचा शोध सुरू असून तो रत्नागिरी येथील असल्याची माहिती समोर आली आहे. त्याला पकडण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाल्याची माहिती मिळते आहे. गेल्यावर्षी कर्जत तालुक्यातील ठाकूरवाडी गावाच्या हद्दीत रेल्वे मार्गालगत एका सुटकेस मध्ये महिलेचा मृतदेह आढळून आला होता. महिलेची हत्याकरून तीचा मृतदेहाचा मृतदेह सुटकेस मध्ये ठेवण्यात आला होता. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. २८ ते ३२ वर्षीय या महिलेची हत्याकरून चेहरा आणि डोक्याला प्लास्टिकच्या पिशवीने बांधण्यात आले होते. हातपाय नायलॉनच्या दोरीने बांधून मृतदेह गुलाबी रंगाच्या एका टॉली असलेल्या सुटकेस मध्ये ठेवण्यात आला होता. पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने तीचा मृतदेह रेल्वे मार्गालगत टाकून देण्यात आला होता. तेव्हा बाळगंगा नदी किनारी एक भलीमोठी काळी सुटकेस आढळून आली. याच सुटकेसमधून उग्रवास येत होता. दुरशेत गावचे सरपंच दशरत गावंड यांनी तात्काळ गावच्या पोलीस पाटलांना बोलावून घेतले.

### पेण येथे काय घडले होते?

सन २०२५ मधेच दुसऱ्या एका घटनेत पेण तालुक्यातील दुरशेत फाटा येथे नदी किनारी एका सुटकेस मध्ये महिलेचा मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याची उकल होऊ शकली नव्हती. पेण तालुक्यातील दुरशेत फाटा येथे उग्र वास येत होता. स्थानिकांच्या हीबाब लक्षात आली. त्यामुळे त्यांनी आसपासच्या परिसरात कुठले जनावर मरून पडले आहे का याचा शोध सुरू केला.

# संभाव्य एल निनोला टक्कर देण्यास महाराष्ट्र सज्ज

## उपलब्ध पाण्याचे नियोजन व जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा- CM देवेंद्र फडणवीस

मुंबई : (स. गांवकरी)

संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी, प्रभावी अंमलबजावणी आणि समन्वयाच्या माध्यमातून या आपत्तीचे सौम्यीकरण करण्यात यावे. यासाठी सर्व विभागांनी तत्काळ उपाययोजना राबवाव्यात. पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाच्या कामांना गती आणि जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन यावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीस कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्यासह कृषी, मदत व पुनर्वसन, वित्त, जलसंपदा, जलसंधारण, भारतीय हवामानशास्त्र विभाग, वित्त व नियोजन विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा



ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत एल निनोचा सर्वाधिक परिणाम जाणवण्याची शक्यता असून पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मे महिन्यात उष्णतेची तीव्रता तुलनेने कमी राहील, मात्र उष्णतेच्या लाटा अधिक प्रमाणात येण्याची शक्यता वर्तविण्यात आली. दरम्यान, पॉझिटिव्ह 'आयओडी' विकसित झाल्यास एल निनोच्या परिणामांची तीव्रता काही प्रमाणात कमी होऊ शकते, असेही यावेळी सांगण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, २०१५ मध्ये पावसाळा संपल्यानंतर राज्यातील पाणीसाठा केवळ ४५ टक्के होता, मात्र सध्या पावसाळा सुरू होण्यापूर्वीच तितका साठा उपलब्ध आहे. त्यामुळे योग्य नियोजन केल्यास राज्याला या परिस्थितीचा सक्षमपणे सामना करता येईल. २०१५ मधील एल निनोच्या कालावधीतील अनुभवावरून २०१८ या वर्षी उपाययोजना केल्यामुळे पिके वाचविता आली. एल निनोच्या कालावधीत पावसातील अनियमिततेमुळे विशेषतः मराठवाड्यात मोठा परिणाम दिसून आला होता. दोन पावसाच्या सरींमध्ये दीर्घ खंड पडल्यास पिकांवर ताण येतो, मात्र संरक्षित सिंचनाच्या माध्यमातून पिकांचे नुकसान कमी करता येते. त्यामुळे जलसंधारण व पाणी साठवण क्षमतेत वाढ करणे अत्यावश्यक आहे. जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार या योजनांची कामे तातडीने आणि मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. या कामांसाठी वित्त विभागाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच जुन्या जल स्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवनाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. यामुळे कमी पैशात जास्त पाणी साठा उपलब्ध होईल. कमी पावसाच्या परिस्थितीतही सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणारी हीच साधने प्रभावी ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. 'जी रामजी योजने'तून होणारी जलयुक्त शिवारची कामे योग्य प्रकारे झाली आहेत की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी तसेच जी रामजी मधून जास्तीत जास्त कामे मिळविण्यासाठी टास्क फोर्स तयार करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील पर्जन्यमान ९० टक्क्यांपेक्षा कमी राहिल्यास पिण्याच्या पाण्यासह शेतीवर मोठा परिणाम होतो. अशा परिस्थितीत नुकसान कमी करण्यासाठी पूर्वतयारी करण्यात यावीत. मनरेगा योजनेअंतर्गत जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देऊन उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करण्याचेही निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच पिण्याच्या पाण्याबाबत केवळ चालू वर्षाचा नव्हे, तर पुढील उन्हाळ्याचाही विचार करून नियोजन कराव्यात. पावसातील संभाव्य घट लक्षात घेऊन पाणी साठवून ठेवणे आणि त्याचा काटेकोर वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पाणी बचतीसाठी आणि इतर पूरक उपाययोजनांसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक स्तरावर टास्क फोर्स स्थापन करण्यात यावे. जिल्हाधिकारी, सिंचन विभागाचे अधिकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्या समन्वयातून पाण्याचा काटेकोर वापर आणि साठवणूक सुनिश्चित केली जावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

### वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत

पशुधनासाठी चारा टंचाई होऊ नये यासाठी आतापासूनच उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. एल निनोचा परिणाम इतर राज्यांवरही होण्याची शक्यता असल्याने बाहेरील राज्यांवर अवलंबून न राहता राज्यातच वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत. धरणांच्या बॅक वॉटर क्षेत्रात वैरण विकास कार्यक्रम हाती घेण्यात यावा. मोठ्या प्रमाणात पशुधन असणाऱ्या तसेच चारा टंचाई जाणविणाऱ्या सोलापूर, सांगली आणि मराठवाडा या भागांमध्ये चारा उपलब्ध कसा होईल, याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना फडणवीस यांनी दिल्या. खतांच्या उपलब्धतेबाबत तात्काळ निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी. 'ॲग्रीस्टॅक' प्रणालीशी खत वितरण जोडून पारदर्शकता वाढविणे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तपासणी यंत्रणा मजबूत करण्यावर भर देण्यात यावा, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### परिक्रमा तंत्रनिकेतनची कु. वैष्णवी शेंडगे ही विद्यार्थिनी राज्यात दुसरी

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : इंटर इंजीनिअरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन राज्यस्तरीय स्पर्धा मध्ये समर्थ सणस मैदान पुणे. येथे संपन्न झालेल्या अॅथलेटिक्स या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये परिक्रमा पॉलिटेक्निक चे कु.वैष्णवी शेंडगे,कु.अविनाश गावडे कु.अनुराधा धुमाळ हे एकूण 3 खेळाडू सहभागी झाले. मुलींमध्ये कु. वैष्णवी शेंडगे हिने २०० मीटर मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. व अतिशय चुरशीच्या स्पर्धेमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत असे यश संपादन केले. आपले व महाविद्यालयाचे नाव राज्यामध्ये झळकावले. या खेळाडूंचे परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक, माजी मंत्री बबनराव पाचपुते, अध्यक्षा डॉ. सौ. प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार श्री. विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी अॅड. प्रतापसिंह पाचपुते, अॅकॅडमी डायरेक्टर सौ. इंद्रायणी पाचपुते, मुख्य अति. कार्यकारी अधिकारी प्रा. अनिल पुंड, अती. अॅकॅडमी डायरेक्टर संजिव कदमपाटील, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी, इंजीनिअरिंग प्राचार्य मोहन धगाटे, एम.बी.ए. डायरेक्टर डॉ. सुदर्शन गिरमकर, फार्मसी प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ, सायन्स कॉलेज प्राचार्य डॉक्टर पांडुरंग इथापे यांनी अभिनंदन केले. व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना परिक्रमा तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी सर व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अशोक राहिंज यांचे मार्गदर्शन लाभले.



### रयत प्रज्ञाशोध परीक्षेत शिंदे कन्या विद्यालयाचे उल्लेखनीय यश

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : कर्मवीर विद्याप्रबोधिनी सातारा यांच्यामार्फत आयोजित केलेल्या सन २०२५ -२६ मध्ये घेण्यात आलेल्या रयत प्रज्ञाशोध (RTS) परीक्षेत श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या पाच विद्यार्थिनींनी सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिष्यवृत्ती मिळवून विद्यालयाचे नाव उंचावले. यशस्वी विद्यार्थिनीमध्ये कु. स्वरा विलास शेळके (158 गुण) कु. समर्था सुनील खामकर (154 गुण) कु. भूमी दिनकर भुजबळ (150 गुण) कु.स्नेहा शंकर. बोनगे (144 गुण) कु.स्वराली हंबीर म्हस्के (142 गुण) यांचा समावेश आहे. या यशस्वी विद्यार्थिनींना विभागप्रमुख सचिन गारुडकर (बुद्धिमत्ता व सामान्यज्ञान ), विषय शिक्षक-कुंदन खामकर (गणित),मिलिंद काळे (विज्ञान ), जयश्री कुदांडे (मराठी), किरण कोकणी (सामाजिक शास्त्र) व विठ्ठल होले (इंग्रजी ) यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थीनीचे रयत शिक्षण संस्था उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे , सहाय्यक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी व प्रमोद तोरणे ,गुणवत्ता कक्षाचे प्रमुख काकासाहेब वाळूंजकर , विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे ,पर्यवेक्षक श्री.बाळासाहेब शिंदे ,गुरुकुलप्रमुख श्री.किरण शिंदे तसेच स्थानिक स्कूल कमिटी सदस्य,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य , ग्रामस्थ पालक, सर्व सहकारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### मंथन परीक्षेत अस्मिता उंडे हिचे यश



श्रीगोंदा (स. गांवकरी) : तालुक्यातील मढेवडगाव येथील उंडेमळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी अस्मिता प्रदिप उंडे इयत्ता तिसरी हिने मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत २१२ गुण मिळवून तालुका गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. रयतसेवक डॉ. प्रदिप जगदेव उंडे यांची ती कन्या आहे. तिला वर्गशिक्षक रामदास ठाकर, संतोष इंगावले यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे, उपसरपंच सुनिता उंडे, नागवडे कारखान्याचे संचालक सुभाष शिंदे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज सुपेकर यांनी तिचे अभिनंदन केले.

### लोहा बाजार समितीतील सत्तासंघर्षाला नवी कलाटणी!

लोहा (स. गांवकरी) : लोहा कृषी उत्पन्न बाजार समिती येथील उपसभापती पदाच्या निवडीवरून सुरू असलेल्या राजकीय वादाला आता नवा ट्विस्ट मिळाला आहे. उपसभापती पदासाठी प्रस्तावित असलेल्या निवडणुकीला लातूरच्या विभागीय सहनिबंधकांनी (सहकारी संस्था) अनपेक्षितपणे स्थगिती दिली आहे. या निर्णयामुळे विद्यमान उपसभापती अण्णासाहेब दत्तात्रय पवार यांना मोठा दिलासा मिळाला असून, माजी आमदार शामसुंदर शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या आशाताई शिंदे आणि सभापती विक्रांत शिंदे यांची मोठी राजकीय कोंडी झाल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. दि ९ मार्च रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीतील ठराव क्रमांक ७ च्या आधारे पवार यांच्या राजीनाम्याला मंजुरी दाखवण्यात आली होती. उपसभापती पद रिक्त झाल्याचे गृहीत धरून नवीन निवडीची प्रक्रियाही तातडीने सुरू करण्यात आली. यानुसार नांदेडच्या जिल्हा उपनिबंधकांनी दि ६ एप्रिल रोजी आदेश काढून दि १७ एप्रिल रोजी निवडणुकीसाठी विशेष बैठक बोलावली होती. सचिवांनी दि ७ एप्रिल रोजी तशी नोटीसही काढली होती.

### तामसा वनपरिमंडळात बोगस कामाचा सपाटा निधीचा मजुरविणा विल्हेवाट

तामसा (स. गांवकरी) : तामसा वनपरिमंडळ विभागातील कथित गैरप्रकारांचा मुद्दा दिवसेंदिवस गंभीर होत असून, आता माहितीच्या अधिकाराखाली मागवलेली माहितीही नाकारली जात असल्याने संशय अधिकच बळावत आहे. संबंधित अधिकाऱ्यांना वरिष्ठांची पाठराखण मिळत असल्याची चर्चा असून, यामुळे विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परिसरात मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होत असल्याचे आरोप आहेत. सागवान वृक्षांची "मिनी रंदा मिशन"च्या नावाखाली कटाई करून वनसंपत्तीचे नुकसान केल्याचे बोलले जात आहे. शिवपुरी येथील उद्यान विकास कामांमध्येही "मार्च एंड"च्या नावाखाली सलग दोन वर्षांत सुमारे १ कोटी रुपयांचा निधी खर्च दाखवून, प्रत्यक्षात मजूर न लावता जेसीबीच्या सहाय्याने कामे केल्याची चर्चा आहे. दरम्यान, या सर्व प्रकारांबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागवण्यात आली असता, "शब्द मर्यादा जास्त आहे."

# चांगल्या कार्याची समाज दखल घेतो – अॅड. काकडे

## राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने रावसाहेब घोडके यांचा सन्मान



श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जातीधर्मातील लोकांना सोबत घेऊन रयतेचे राज्य उभारले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी परदेशात उच्च शिक्षण घेऊन देशाला संविधानाच्या माध्यमातून दिशा दिली, तर महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाज प्रबोधन आणि शिक्षणासाठी मोलाचे योगदान दिले. या महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून संविधान प्रचारक रावसाहेब हरिभाऊ घोडके हे गावोगावी सायकलवर फिरून समाजप्रबोधन आणि जनजागृती करत आहेत. त्यांच्या या कार्याची समाज निश्चितच दखल घेतो, असे प्रतिपादन सहकार महर्षी काष्टी संस्थेचे माजी अध्यक्ष अॅड. विठ्ठलराव काकडे यांनी केले. दि. १८ एप्रिल रोजी श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे सहकार महर्षी काष्टी सेवा संस्थेच्या सहकार सभागृहात सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब हरिभाऊ घोडके यांचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला. संस्थेचे मार्गदर्शक ज्येष्ठ नेते कैलासतात्या पाचपुते यांच्या हस्ते फेटा, शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अॅड. विठ्ठलराव काकडे, राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते, जिल्हा सचिव पिटर रणसिंग, पत्रकार प्रा. राम सोनवणे तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना अॅड. काकडे यांनी समाजातील सद्यस्थितीवर भाष्य करताना सांगितले की, समाजात सर्व जातीधर्मातील लोक गुण्यागोविंदाने राहत असले तरी काही राजकारणी स्वार्थासाठी जाती-धर्माच्या नावाखाली द्वेष निर्माण करून राजकारण करतात. त्यामुळे विकासाचे खरे मुद्दे मागे पडतात.

अशा परिस्थितीत रावसाहेब घोडके यांसारखे कार्यकर्ते अपवाद ठरतात. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर घोडके यांनी सायकलवरून गावोगावी फिरत 'झाडे लावा, झाडे जगवा', 'छोटे कुटुंब – सुखी कुटुंब', 'शिक्षण घ्या, सुशिक्षित व्हा', 'संकटकाळी मदत करा' यांसारख्या संदेशांसह महापुरुषांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पत्रकार संघाने त्यांचा सन्मान केल्याचे काकडे यांनी नमूद केले. तसेच घोडके यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला शकुंतला संस्थेचे अध्यक्ष जालिंदर पाचपुते, संचालक लक्ष्मणराव पाचपुते, पोपटराव पाचपुते, रोहिदास सोनवणे, व्यवस्थापक नामदेव गावडे, ह.भ.प. मच्छिंद्र सोनवणे, संतोष नलगे, चंद्रकांत जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी पत्रकार पिटर रणसिंग यांनी आभार मानले.

## भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका महत्त्वाची : दीपक करंजीकर

पुणे : (स. गांवकरी)




समृद्ध भारत घडवण्यासाठी केवळ शासनाच्या योजना पुरेशा नाहीत, तर प्रत्येक नागरिकाने स्वतःची जबाबदारी ओळखून प्रामाणिकपणे योगदान देणे अत्यावश्यक आहे. तरुणांनी केवळ नोकरीकडे न पाहता रोजगारनिर्मितीकडे वळावे, नवीन संधी शोधाव्यात आणि देशाच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रख्यात अर्थकारण व समाजकारण अभ्यासक दीपक करंजीकर यांनी केले. नागरिक सोशल फाउंडेशन आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले "समृद्ध भारत आणि मी" या विषयावरील व्याख्यानात करंजीकर बोलत होते, या प्रसंगी नागरिक सोशल फाउंडेशनचे संचालक प्रितम थोरवे,अमेय सप्रे, शेखर यादव, वक्ता विभागाचे प्रमुख दीपक मेहेंदळे आदि मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना करंजीकर म्हणाले, भारताची समृद्धी ही केवळ आर्थिक बाबींवर अवलंबून नसून, सांस्कृतिक मूल्ये, नैतिकता, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक एकता या घटकांवरही तितकीच अवलंबून असल्याचे त्यांनी नमूद केले. डिजिटल युगात भारत वेगाने प्रगती करत असताना, त्या प्रगतीला योग्य दिशा देण्याची जबाबदारी युवकांवर आहे.

## अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणास तातडीने स्थगिती द्या

### नेवासा काँग्रेस व वंचीत बहुजन आघाडीचे तहसीलदार यांना निवेदन

नेवासा : (स. गांवकरी)



महाराष्ट्र शासनाने दहा एप्रिल रोजी अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरन करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. ही प्रक्रिया तातडीने बंद करण्याचे निवेदन नेवासा काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने तहसीलदार यांना दिले. राज्य सरकारने सुरु केलेल्या उपवर्गीकरण प्रक्रियेमुळे अनुसूचित जातीमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.आरक्षणाच्या प्रक्रियेत बदल करताना पारदर्शकता,न्याय, आणि सर्वसमावेशक प्रक्रिया अपेक्षित असते, दुर्दैवाने सध्या सुरु असलेल्या उपवर्गीकरन प्रक्रियामध्ये पारदर्शकता दिसून येत नाही.उपवर्गीकरणासाठी केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती स्थापन केलेली असून यात समाजाचा एकही प्रतिनिधी यात समावेश नाही.तसेच समितीचा अहवाल जनतेसमोर सादर न करता केवळ आक्षेप मागितले जात आहे.याशिवाय अंत्यन्त घाई घाईत प्रक्रिया पूर्ण करण्याचा सपाटा लावला जात आहे. या सर्व गोष्टी संशयस्पद असल्यामुळे ही उपवर्गीकरण प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली.यावेळी दिलेल्या निवेदनात उपवर्गीकरण समितीचा अहवाल सार्वजनिक करण्यात यावा,राज्यभरात जणसूनावण्या घेण्यात याव्या.व जनतेची मते विचारात घेण्यात यावी,सर्व आक्षेप, सूचना विचारात घ्याव्यात व नंतरच अंतिम निर्णय घ्यावा.या मागण्या करण्यात आल्या.यावेळी काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी उपवर्गीकरण प्रक्रिया ही अंत्यन्त गंभीर असून अनुसूचित जातीवर अन्याय करणारी आहे,त्यामुळे तातडीने ही प्रक्रिया बंद करावी.वंचित अध्यक्ष पोपटराव सरोदे यांनी अनुसूचित जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम हे सरकार करत आहे. काँग्रेसचे अंजुम पटेल यानी उपवर्गीकरणामुळे राज्यातील अनुसूचित जातीमध्ये तीव्र असंतोष पसरला असून लवकरच याविरोधात मोठे आंदोलन उभारणार असे स्पष्ट केले. निवेदनावेळी वंचितचे उपाध्यक्ष संदीप क्षीरसागर, महासचिव गणपत मोरे,युवा नेते हरीश चक्रनारायण,संजय वाघमारे,काँग्रेसचे सतीश तऱ्हाळ,गोरक्षनाथ काळे, संजय होडगर आदी उपस्थित होते.यावेळी तहसीलदार यांनी निवेदन स्वीकारले.

## महात्मा फुले व डॉ. आंबेडकर जयंतीचे यशस्वी आयोजन

श्रीगोंदा : (स. गांवकरी)




महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या देशासाठीच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक जीवनात यश संपादन करावे, असे आवाहन केले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस यांनीही मार्गदर्शन करत महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांमुळे समाज प्रगत झाला असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र मौखिक साधन व संकलन अभियानाचे प्रमुख कृष्णा घोलप उपस्थित होते. त्यांनी 'गुलामगिरी ते संविधान' या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी करत थोर पुरुषांना जातीत विभागू नये, तर त्यांच्या विचारांचा स्वीकार करावा, असे मत व्यक्त केले. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून संविधानामुळेच आज आपण समताधिष्ठित समाजात जगत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. संविधानाधिष्ठित संस्कृती रुजविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी आवाहन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

थोर व्यक्तींच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचे आचरण व वाचनाद्वारे आत्मसात करणे, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल, असे त्यांनी सांगितले. बाळासाहेब महाडिक यांनीही आपले विचार व्यक्त केले.

सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. राजाराम कानडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य महावीर पटवा, सचिन महाडिक, योगेश भोसले, उपप्राचार्य डॉ. नितीन थोरात, प्रा. रत्नाकर झिटे, प्रा. उषा बोरुडे, रासेयो प्रमुख प्रा. भाऊ बुलाखे, प्रा. देवेंद्र बहिरम, डॉ. राहुल गायकवाड, शा. शि. संचालिका प्रा. कल्पना बागुल, प्रा. रमेश थोरात, डॉ. राजेंद्र ठाकरे, डॉ. रावसाहेब काळे, डॉ. हरिभाऊ वाघीरे तसेच विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय फटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अनिल ढवळे यांनी केले.



## महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त किनवटमध्ये उत्साहात कार्यक्रम

किनवट : (स. गांवकरी)

महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त किनवट शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त आयोजित प्रमुख कार्यक्रमात नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार व युवा नेते करण येंड्रलवार यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा गौरव करत समाजात समता, बंधुता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या शिकवणीचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी भाजपा नेते सुधाकर भोयर, राघू मामा, शिवकुमार भंडारे, सतीश बिराजदार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास यादवराव नेम्मानिवार (क्वालिटी), भाजपा किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष सतीशराव नेम्मानिवार, पत्रकार दत्ता जयभायें यांच्यासह अनेकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून अभिवादन केले. कार्यक्रमात महिलांची लक्षणीय उपस्थिती दिसून आली, ज्यामुळे कार्यक्रमाला अधिक उत्साहपूर्ण वातावरण लाभले. आयोजकांनी कार्यक्रमाचे नियोजन सुयोग्यरीत्या केल्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# गावाकडचा भन्नाट जुगाड : गॅस टंचाईवर लोह्याच्या अवलियाची मात!

## लाकूड आणि 'वेस्ट ऑईल'वर चालणारी धूरमुक्त शेगडी; हॉटेल व्यावसायिकांना मोठा दिलासा

लोहा (स. गांवकरी)



लोहा इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याचे पडसाद आता स्थानिक पातळीवरही उमटत आहेत. व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या वाढत्या किमती आणि हॉटेल व्यावसायिकांवर गॅस वापराबाबत येत असलेल्या निर्बंधांमुळे पर्यायी साधनांची मोठी गरज भासू लागली आहे. अशा या संकटाच्या काळात लोहा शहरातील एका कल्पक तंत्रज्ञाने 'गरज ही शोधाची जननी आहे' या म्हणीला साजेसा असा भन्नाट जुगाड शोधून काढला आहे. त्यांनी चक्क लाकूड आणि टाकाऊ (वेस्ट) ऑईलवर चालणारी 'धूरमुक्त शेगडी' तयार केली असून, त्यांच्या या कल्पकतेची सध्या सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे.

लोहा शहरातील गणेश घोडके असे या अवलियाचे नाव आहे. गणेश यांनी बारावीनंतर 'आयटीआय'मधून वेल्डरचा कोर्स पूर्ण केला. गेल्या पंचवीस वर्षांपासून ते शहरात वेल्डिंगचे दुकान चालवत आहेत. आपल्या याच प्रदीर्घ अनुभवाचा आणि कौशल्याचा वापर करून त्यांनी गॅस टंचाईवर मात करणारा हा अभिनव उपाय शोधून काढला आहे. घोडके यांनी बनवलेल्या या शेगडीला आता हॉटेल व्यावसायिकांकडून मोठी मागणी येत आहे.

लाकडावर चालणारी शेगडी: या शेगडीचे वजन ४५ ते ५० किलो असून, तिची किंमत १६ हजार रुपये इतकी आहे.तर ऑईलवर चालणारी शेगडी केवळ २५ ते ३० किलो वजनाची ही शेगडी १० हजार रुपयांत उपलब्ध करून देण्यात आली आहे.विशेष म्हणजे, ही शेगडी चालवण्यासाठी वाहनांमधून निघणाऱ्या जळक्या (वापरलेल्या) तेलाचा इंधन म्हणून पुनर्वापर केला जातो. त्यामुळे हा एक अत्यंत पर्यावरणपूरक आणि कमी खर्चाचा पर्याय ठरला आहे. या शेगड्या 'झिरो मेंटेनन्स' असून, घोडके यांच्याकडून ग्राहकांना त्यावर एक वर्षाची वॉरंटीही दिली जात आहे.

गॅस बंदीमुळे अडचणीत आलेल्या हॉटेल आणि छोटे-मोठे व्यवसायिकांसाठी ही शेगडी सध्या वरदान ठरत आहे. व्यावसायिक पातळीवर मिळालेल्या या यशानंतर, आता सामान्य कुटुंबांचा स्वयंपाकाचा खर्च कमी करण्यासाठी 'घरगुती शेगडी' बनवण्याचा गणेश घोडके यांचा मानस आहे.टाकाऊ वस्तूंमधून टिकाऊ आणि समाजाला उपयुक्त अशी यंत्रणा उभी करणाऱ्या या प्रयोगामुळे, भारतातील युवक केवळ नोकरीच्या मागे न धावता, संकटातून संधी शोधून 'आत्मनिर्भर' भारताच्या दिशेने यशस्वी वाटचाल करत असल्याचे समाधानकारक चित्र पाहायला मिळत आहे.

यावरून आपल्या देशात प्रतिभावान व्यक्तींची अजिबात कमतरता नाही, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. आता स्थानिक पातळीवरील अशा नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रशासकीय पातळीवरून पाठबळ आणि प्रोत्साहन मिळण्याची नितांत गरज व्यक्त होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### रावेर येथे ईद मिलन उत्साहात

रावेर (स. गांवकरी) : जमातअते इस्लामी हिन्द रावेर महिला शाखा तर्फे महिलासांठी विशेष ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरचे छोटे खानी कार्यक्रम नगरसेवक सादिक शेख यांचे घरी ठेवण्यात आले होते . जमाअते इस्लामी हिन्द समाजात जातीय सलोखा , बंधुभाव , निर्माण करण्याचे सतत प्रयत्न करत असते या निमित्ताने हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते . कार्यक्रमाची सुरुवात आस्मा खान यांनी पवित्र कुरान मराठी भाषांनतर केली . वाजेदा सादिक शेख यांनी सुरेश भट यांची लिखित मोहममंद पैगंबर वर मराठी नात पढनकेले . या प्रसंगी संगीता महाजन लोक नियुक्त नगराध्यक्षा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगीतले की आज समाजाला प्रेम बंधू भाव एकमेकांचा धर्माची शिकवण समजून घेण्यासाठी असे कार्यक्रमाची गरज असल्या बद्दल जमात ए इस्लामी चे कौतूक केले .या वेळी श्रीमती साजेदा परवीन यांनी सांगीतले की रमजान , रोजे , कुरआन , बद्दल आपले विचार व्यक्त करताना सांगीतले की एकमेकांचे धर्म व विचार समजण्या साठी व गैरसमज दुरकरण्याची गरज आहे . या प्रसंगी सर्व उपस्थित मान्यवर महिलांचा स्वागत करण्यात आले . यावेळी शिरखुर्मा वाटण्यात आला . कार्यक्रमास संगीता महाजन नगराध्यक्षा , डॉ. हर्षा दिंगबर, नगरसेविका अर्चना पाटील ' अनिता तायडे , सीमा जमादार , सालेहा खान' कल्पना सावकारे, कविता अग्रवाल ' रेखा चौधरी, मंगला भास्कर, संगीता महाजन , शीतल पाटील ' गुनजन ताई ' मंजूश्री ताई , सायमा बाजी , धनश्री मॅडम ' आदि उपस्थित होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक सानिया खलील यांनी केले आसमा खान आभार प्रदर्शन केले. अतिशय सुंदर छोटे खानी कार्यक्रम संपन्न झाला.

### नेत्रतपासणी केंद्र व पशुवैद्यकीय विभागाचे नुतनीकरण



ठाणे (स. गांवकरी) :ठाणे महानगरपालिकेच्या वतीने वर्तकनगर येथील स्व. निर्मलादेवी चिंतामण दिघे रुग्णालय, लोकमान्य टिळक नर्सिंग होम येथे नेत्र तपासणी व उपचार केंद्र व वागळे इस्टेट येथील जीर्ण झालेल्या पशु शस्त्रक्रिया विभागाचे नूतनीकरण करून नवीन 88 पिंजऱ्यांसह उदघाटन नुकतेच महापौर महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ. शानू पठाणे, स्थानिक नगरसेविका एकता भोईर, संध्या मोरे, यज्ञा भोईर, माजी नगरसेवक एकनाथ भोईर, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील आदी उपस्थित होते. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला हा उपक्रम समाजासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. डोळे हे मानवी शरीरातील अत्यंत महत्त्वाचे अवयव असून योग्य वेळी तपासणी व उपचार न झाल्यास दृष्टीदोष निर्माण होऊ शकतो. अशा परिस्थितीत हे नवीन केंद्र नागरिकांसाठी आशेचा किरण ठरणार असल्याचे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले. या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ ठाणे स्कायलाइन यांनी दिलेले सहकार्य मोलाचे आहे. या केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना आधुनिक नेत्र तपासणी, योग्य उपचार आणि आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. तर वागळे इस्टेट येथे जीर्ण झालेल्या पशुवैद्यकिय विभागाअंतर्गत भटक्या कुत्र्यांसाठी 60 ते 70 पिंजरे होते, सदर केंद्राचे नुतनीकरण करुन नवीन 88 पिंजऱ्याचे उद्घाटन करण्यात आले.

### गुंदिया गावात मध्यान्ह भोजन भरतीत गैरव्यवहाराचे आरोप

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील आहवा तालुक्यातील गुंदिया गावात मध्यान्ह भोजन योजनेतील संचालक पदाच्या भरती प्रक्रियेवरून वाद दिवसेंदिवस तीव्र होत आहे. भरती प्रक्रियेत गैरव्यवहार आणि नियमभंग झाल्याचे गंभीर आरोप करत अर्जदाराने जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून न्यायाची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वर्ष 2025-26 साठी आहवा तालुक्यात मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत विविध पदांसाठी भरती जाहीर करण्यात आली होती. त्यामध्ये गुंदिया गावातील संचालक पदासाठी भरती पूर्ण झाल्यानंतर अनिताबेन मोहनभाई बंगाळ यांना नियुक्तीपत्र देण्यात आले होते. ही नियुक्ती अपात्र असल्याचा दावा करत अर्जदाराने दिनांक 09/07/2025 रोजी प्रांत अधिकारी, डांग-आहवा यांच्याकडे लेखी निवेदन दिले होते. तसेच त्याची प्रत मामलतदार, आहवा आणि संबंधित अधिकाऱ्यांनाही पाठवण्यात आली होती. तथापि, या निवेदनावर कोणतीही कारवाई होण्यापूर्वीच मामलतदार, आहवा यांनी नियुक्तीपत्र दिल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे. त्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेवर संशय निर्माण झाला आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, आजपर्यंत त्यांच्या तक्रारीवर कोणताही अधिकृत प्रतिसाद किंवा चौकशी करण्यात आलेली नाही.अर्जदाराने पुढे असा आरोप केला आहे की भरती प्रक्रियेत गुजरात सरकारच्या शिक्षण विभागाच्या ठराव (क्रमांक: मभय/102016/415141/आर, दिनांक 03/10/2016) मधील अटींचे पालन करण्यात आलेले नाही. विशेषतः, एका कुटुंबातील फक्त एका व्यक्तीचीच नियुक्ती करण्याच्या नियमाचा भंग झाला असून, गरीबी रेषेखालील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्याचा नियमही दुर्लक्षित करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### डांग जिल्हा परिषद आहवा-२ सीटवर मामा-भाचा कुटुंबात थेट सामना

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून, आहवा-२ जिल्हा परिषद मतदारसंघ सध्या संपूर्ण जिल्ह्यात "हॉट सीट" ठरत आहे. या ठिकाणी भारतीय जनता पार्टी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्यात चुरशीची लढत रंगत आहे. मात्र, या निवडणुकीची सर्वाधिक चर्चा उमेदवारांच्या कौटुंबिक नातेसंबंधांमुळे होत आहे. या मतदारसंघात राजकारणासोबतच नात्यांचाही अनोखा संगम पाहायला मिळत आहे. मामा आणि भाच्याच्या कुटुंबांमध्ये थेट सामना रंगला आहे. या राजकीय समीकरणांनुसार, भारतीय जनता पक्षाने श्रद्धाबेन तुषारभाई खरे यांना उमेदवारी दिली आहे, तर त्यांच्या विरोधात काँग्रेसकडून त्यांचे सख्खे मामा दिपकभाई पिंपळे निवडणूक लढवत आहेत. विशेष म्हणजे, दिपकभाई पिंपळे यांनी काही काळापूर्वी भाजपला सोडचिठ्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे, त्यामुळे या लढतीला अधिकच रंग चढला आहे. एकाच कुटुंबातील दोन सदस्य वेगवेगळ्या पक्षांकडून आमनेसामने आल्याने मतदारांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नातेसंबंधातही ताण निर्माण झाल्याची चर्चा आहे आणि ही लढत "काटे की टक्कर" म्हणून पाहिली जात आहे.

# चौथीच्या विद्यार्थ्यांचा अनोखा पदवीदान समारंभ संपन्न

## थोर महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत - खासेराव शितोळे



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेत इयत्ता चौथी मध्ये पदवी देण्याचा जो कार्यक्रम केला आहे. तो कार्यक्रम गेली दोन-तीन वर्ष तो चालू आहे.

मला पहिल्यांदाच आज कळालं की चौथीच्या विद्यार्थ्यांना पदवी दिली जाते. तेव्हा माझ्या हे लक्षात आलं की असा उपक्रम माझ्या पाहण्यात कुठल्याही प्राथमिक शाळेमध्ये आलेला नाही.स्पर्धा करायची ती स्वतःशी करायची.काल मी काय होतो आज मी काय आहे उद्या मला काय व्हायचंय ही स्पर्धा आपल्या मनामध्ये कायमस्वरूपी असली पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे आत्मचरित्र वाचा.हे सगळे मोठमोठे आदर्श होते.थोर महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत.असे प्रतिपादन निवृत्त प्राचार्य खासेराव शितोळे यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या बागडपट्टी विभागातील प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ प्रसंगी उद्योजक श्रीगोपालजी जाखोटीया यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी देऊन सन्मान करण्यात आला.तसेच सुमतीलाल कोठारी यांची हिंद सेवा मंडळाचे नुतन कार्याध्यक्षपदी व विलास बडवे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली म्हणून विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थितीत निवृत्त प्राचार्य खासेराव शितोळे,हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,उपाध्यक्ष विलास बडवे,शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा,मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदिश झालानी, शालेय समिती सदस्य रविंद्र गुजराती,विष्णू सारडा, लक्ष्मीनिवास सारडा, मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे आदी उपस्थित होते.

उद्योजक श्रीगोपाल जाखोटिया म्हणाले,मी हिंदसेवा मंडळाचा विद्यार्थी आहे.या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा व मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे हे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवीत असतात.त्यामुळे शाळेची प्रगती झपाट्याने होत आहे.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, चौथीच्या विद्यार्थ्यांच्या पदवीदान समारंभ प्रथमच पाहत आहे.हिंदसेवा मंडळाची प्राथमिक शाळेत नेहमीच नवनवीन उपक्रम राबविण्यात येतात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे यांनी केले. तर आभार गौरी ब्रम्हे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.मनिषा साळी, सौ.सासवडकर अंजली,पठाण मुदस्सिर, सौ.धाडगे अरुणा, सौ.पोतदार विदया,अभिजित जवादे,श्रीम्.जंगम मनिषा, सौ.चावरे कल्पना,सौ.सोनाली मच्चा,सौ.सपना धोत्रे,सौ.अर्चना वाकचौरे,सौ.अर्चना परभणे, कु.माधुरी धायतडक,संदिप कळसकर, सौ.नंदा देवतरसे, सौ.दिपाली कोल्हे आदींनी परिश्रम घेतले.

हिंदसेवा मंडळाच्या सर्व शाळांचे भौतिक सुविधा व गुणवत्ता उत्तम असल्याने प्रत्येक पालकाला आपली मुले हिंदसेवा मंडळाच्या शाळेत शिकवावी असे वाटते.यंदाच्या वर्षी हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेत क्षमतेपेक्षा जास्त,मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी होईल असे वाटते.

मधुसूदन सारडा म्हणाले, शाळेतील विद्यार्थ्यांची दरवर्षी स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतली जाते. प्रज्ञाशोध परीक्षा, स्टुडन्ट टॅलेंट सर्च, डॉ.हेडगेवार प्रतिष्ठानची स्पर्धा परीक्षा अशा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये राज्यात व जिल्ह्यात शाळेतील विद्यार्थी चमकले आहेत.

शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी हिंदसेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी नेहमीच सहकार्य करीत असतात.

# टिटवाळ्यामधून पाच कोटी रुपयांचे एमडीएमए ड्रग्ज जप्त

टिटवाळा : (स. गांवकरी)

टिटवाळ्यातील पद्मावती रॉयल या गृहसंकुलातून एका ४० वर्षीय महिलेला तब्बल ५ कोटी रुपयांचे एमडीएमए (नशेच्या गोळ्या) सह अँटी नार्कोटिक सेल ने रविवारी पहाटे पाच वाजता ताब्यात घेतल्याने मोठी खळबळ उडाली असून मुंबईतील ड्रग्स कनेक्शन ची सूत्रे टिटवाळ्यापर्यंत पोहचली आहेत.





याबाबतचे सविस्तर वृत्त असे कि,अँटी नार्कोटिक सेल घाटकोपर युनिटकडून साकीनाका पोलीस ठाण्याच्या अंतर्गत दाखल असलेल्या सीआर नंबर ४५/२६ अंतर्गत एनडीपीएस गुन्ह्यातील मुख्य आरोपी फ्रान्सिस पॉल याच्याकडून १०४ ग्रॅम एमडीएमए ड्रग्स जप्त करण्यात आले होते. पोलीस कोठडीतील तपासात फ्रान्सिस पॉल याने आणखी माल हा आपली पत्नी अश्विनी भगवान साठे उर्फ अश्विनी फ्रान्सिस पॉल (वय ४०) मूळ राहणार देहू रोड पुणे सध्या राहणार पद्मावती रॉयल कॉम्प्लेक्स हिच्याकडे ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी तिच्या निवासस्थानी छापा टाकून सुमारे ५ कोटी ७ लाख ५० हजार रुपये इतके किंमतीच्या ४०५६ एक्स्टसी गोळ्या (सुमारे २०३० ग्रॅम) जप्त करण्यात आल्या. आरोपी महिला अश्विनी फ्रान्सिस पॉल हिला कल्याण येथील न्यायालयीन दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करून अटकेची प्रक्रिया पूर्ण करून तपासकामी मुंबई येथे नेण्यात आले.

# पशुपालकांना किसान क्रेडिट कार्ड योजना; ३ लाखांपर्यंत कर्ज

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पशुपालकांना आर्थिक बळकटी देण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' मोहिम राबविण्यात येत असून या योजनेतून पात्र पशुपालकांना ३ लाख रुपयांपर्यंत कर्जसुविधा उपलब्ध होणार असल्याची माहिती अहिल्यानगरचे पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. उमेश पाटील यांनी दिली.

राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त किरण पाटील यांच्या मार्गदर्शनात अहिल्यानगर जिल्ह्यातही ही मोहीम राबविली जाणार आहे. पशुपालन, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन व वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना पशुधनाच्या देखभालीसाठी व दैनंदिन खर्चासाठी आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज दिले जाते. ज्यांच्याकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंत विनातारण कर्ज उपलब्ध होणार असून दूध संस्थेची हमी असल्यास ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत



वाढवता येते. ज्या पशुपालकांकडे आधीच किसान क्रेडिट कार्ड आहे, त्यांनाही पतमर्यादा वाढवून ३ लाख रुपयांपर्यंत लाभ घेता येणार आहे. कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला तरी नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून ३ टक्के व राज्य शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२५ च्या निर्णयानुसार ४ टक्के अशी एकूण ७ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत मिळते. बँकांकडूनही २ टक्के सवलत दिल्याने नियमित परतफेड करणाऱ्या पशुपालकांना शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळू शकतो. सन २०२६-२७ पासून मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गतही या कार्डद्वारे खेळते भांडवलाचा लाभ मिळणार आहे. राज्यातील १० लाख पात्र पशुपालकांना या योजनेच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट विभागाने ठेवले आहे. दूध सोसायटी, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद असलेले व अद्याप योजनेचा लाभ न घेतलेले पशुपालक या मोहिमेसाठी पात्र आहेत. योजनेसाठी प्रकल्प धारकाने केंद्र, राज्य शासन किंवा जिल्हा परिषदेच्या अन्य अनुदान योजनांचा लाभ घेतलेला नसावा. सर्व पशुधनाची एनडीएलएम पोर्टलवर नोंद आवश्यक आहे. व्याज सवलत ही ठरावीक किमान पशुधन संख्या असलेल्या पशुपालकांनाच लागू राहील. यामध्ये २५ हजार मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५० हजार अंडी उत्पादक पक्षी, ४५ हजार क्षमतेचे हॅचरी युनिट, १०० पर्यंत दुधाळ जनावरे, ५०० पर्यंत मेंढी किंवा शेळी गट व २०० पर्यंत वराह यांचा समावेश आहे. घेतलेल्या कर्जाची परतफेड कर्ज उचल केल्याच्या तारखेपासून एका वर्षाच्या आत पूर्ण करणे आवश्यक आहे.

# अभोण्यात पार पडले काँग्रेसची सृजन संघटन अभियान बैठक!

- शेमिना शेफिक यांच्या अध्यक्षतेखाली संघटन मजबूत करण्याचे आवाहन
- तरुणांना संधी देऊन जबाबदाऱ्या देण्याच्या वरिष्ठांच्या सूचना

कनाशी (ग्रामीण) : (स. गांवकरी)





कळवण तालुक्यातील अभोना येथे सांस्कृतिक हॉलमध्ये महाराष्ट्र प्रदेश आदिवासी काँग्रेस पक्षाच्या वतीने सृजन संघटन अभियान उत्साहात संपन्न झाले. सदर कार्यक्रमाला आलेल्या विशेष मान्यवरांचे स्वागत करण्यात आले .जेष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय काँग्रेस नेत्या शमीना शेफिक होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री पद्माकर वळवी जिल्हा प्रभारी संदीप पाटील ,नाशिक जिल्हा उत्तर अध्यक्ष रमेशजी कहांडोळे ,ज्ञानेश्वर गायकवाड,माजी आमदार काशिनाथ बहिरम,आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक करतांना कळवण ब्लॉक अध्यक्ष के के गांगुर्डे यांनी प्रथम या अभियानाची भूमिका स्पष्ट केली. माजी मंत्री पद्माकर वळवी यांनी सृजन संघटन अभियानाचे महत्व पटवून देत हे संघटन मजबूत करण्यासाठी विशेषतः तरुण मंडळी सह कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा आणि राहुल गांधी यांचे काँग्रेसी विचारधारा जण माणसात घराघरात पोचवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

जिल्हा प्रभारी संदीप पाटील यांनी जिल्हा आणि तालुका स्तरावरील आगामी संघटनात्मक निवडणुका पारदर्शक आणि तळागाळात काँग्रेस पोहचवण्याचे काम करावे असे आवाहन करण्यात आले.आगामी काळात तरुणांना पहिले प्राधान्य देऊन त्यांच्यावर जबाबदाऱ्या सोपवल्या जातील. तरुणांनी या संधीचे सोन करून आगामी निवडणुकीत काँग्रेसला घवघवीत यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे. तर इच्छुक उमेदवारांनी अध्यक्ष पदासाठी अर्ज सादर करावेत असेही त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे , विरोधी पक्षनेते राहुल गांधी , प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ , यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिकधिक सक्षम करण्याचा निर्धार त्यांन व्यक्त करण्यात आला. तसेच महिलांवरील वाढत्या अत्याचाराबद्धल आणि भोंदू बाबाच्या वाढत्या घटनांवर त्यांनी नाराजी व्यक्त केली. येणारा काळ हा काँग्रेसचाच असून सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागायचे आहे जनतेला सत्य समजले आहे शेतकर्यांपासून तर अगदी रोजगरपर्यंत या सरकारने अगदी बेजार केले आहे त्यामुळे आपल्याला आता काँग्रेस शिवाय पर्याय नाही येणारा काळ आणि बेजार झालेली जनता ह्या फेकू सरकारला धडा शिकवेल.असे यावेळी सांगण्यात आले.

# रावेर-पुनखेडा पातोंडी मार्गाची दुरवस्था; नागरिक संतप्त

रावेर : (स. गांवकरी)

खड्डे, सैल खडी आणि वाहानांमुळे उडणाऱ्या धुळीमुळे रस्त्या लगतच्या केळीची खालवली अपघाताचा धोका वाढला; शेतकऱ्यांचे पिकांनाही फटका रावेर-पुनखेडा-पातोंडी या महत्त्वाच्या मार्गाचे काम अपूर्ण राहिल्याने नागरिक आणि शेतकरी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून सैल खडीमुळे वाहतूक करणे धोकादायक बनले आहे.



या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात शेतीमालाची वाहतूक केली जाते. तसेच शाळेच्या बसेस आणि अतुर्ली-मुक्ताईनगर परिसरातील नागरिकांची नियमित ये-जा सुरू असते. मात्र, डांबरीकरण न झाल्याने वाहनांच्या हालचालीदरम्यान मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. उडणाऱ्या धुळीचा थेट परिणाम शेतातील पिकांवर होत असून पिकांवर धुळीचा थर साचून त्यांच्या वाढीवर विपरीत परिणाम होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. याशिवाय, उडणारी खडी आणि धुळीमुळे दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना वाहन चालवताना मोठा धोका निर्माण झाला आहे. या परिस्थितीमुळे अपघाताची शक्यता वाढली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, या गंभीर समस्येकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून रस्त्याचे काम पूर्ण करून डांबरीकरण करावे, अशी जोरदार मागणी नागरिक आणि शेतकरी वर्गातून होत आहे.

# नारायणगव्हाणच्या चुंबळेश्वर देवस्थानला नवी ओळख

## ४० लाखांच्या कीर्तन मंडपाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न

पारनेर : (स. गांवकरी)



सोमवार दि. २० एप्रिल २०२६ नारायणगव्हाण येथील श्री क्षेत्र चुंबळेश्वर महादेव मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आज पार पडला. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून पर्यटन विकास निधीतून मंजूर झालेल्या सुमारे ४० लाख रुपये खर्चाच्या भव्य कीर्तन मंडप बांधकामाचे भूमिपूजन विधीवत संपन्न झाले. या मंडपामुळे मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रम, कीर्तन-भजन, प्रवचन यांसाठी सुयोग्य व सुसज्ज व्यवस्था निर्माण होणार असून, भाविकांना अधिक सोयीस्कर आणि व्यवस्थित सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे या ठिकाणच्या धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना नवे बळ मिळणार आहे. यावेळी आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले "आपल्या तालुक्यातील देवस्थानांचा विकास हा केवळ श्रद्धेचा भाग नसून, तो ग्रामीण भागाच्या प्रगतीशी थेट जोडलेला आहे. चुंबळेश्वर मंदिरासारख्या ठिकाणांचा विकास केल्यास येथे येणाऱ्या भाविकांची संख्या वाढेल, स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि गावाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळेल. पर्यटन विकासाच्या माध्यमातून आपल्या भागातील परंपरा आणि संस्कृती जतन करत विकास साधण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील." या प्रसंगी सुनील थोरात, बाळासो कळमकर, सुरेश बोरुडे सर, संतोष गायकवाड, खिवंसरा काका, सहादू शेळके, बंडोपंत नाईक, तारा दरेकर, संजय शेळके, दादासाहेब शेळके, विकास पवार, हुसेन शेख, गणेश शेळके, हेमंत कांडेकर, सौ. मनीषा जाधव, सविता भोसले, श्रीमती अनुसया कांडेकर, अण्णा चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, भरत भोसले, मेजर काशिनाथ नवले, प्रताप अंबुले, सौ. उषा संजय शेळके, सौ. कामिना विकास पवार आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूमिपूजन सोहळ्यामुळे नारायणगव्हाण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, या कामामुळे चुंबळेश्वर मंदिर परिसर अधिक आकर्षक व सुविधायुक्त होणार असल्याने भाविकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

"आमदार काशिनाथ दाते सरांनी नारायणगव्हाणसारख्या ग्रामीण भागातील देवस्थानाच्या विकासासाठी घेतलेली पुढाकार खरोखर कौतुकास्पद आहे. चुंबळेश्वर मंदिरासाठी कीर्तन मंडप उभारणीमुळे भाविकांना मोठी सुविधा मिळणार आहे. सरांनी केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कामातून विकास घडवून आणला आहे, याचे समाधान वाटते. त्यांच्या या कामामुळे गावाच्या धार्मिक व पर्यटनदृष्ट्या प्रगतीला नक्कीच चालना मिळेल. पुढील काळातही अशाच पद्धतीने विकासकामे सुरू राहतील, असा विश्वास आहे."
**- सुरेश बोरुडे सर, माजी सरपंच नारायणगव्हाण**

# मतदारांची मतदार यादीतील विरोधी मतदारांची नावे गायब !

## मतदार यादी विशेष पुनरावलोकन मोहिमेच्या माध्यमातून विरोधी मतदारांची नावे गायब करण्याचे षड्यंत्र – किरण काळे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

सध्या महाराष्ट्रासह देशातील २२ राज्यांमध्ये मतदार यादी विशेष पुनरावलोकन मोहिम (एसआयआर) राबवली जात आहे. विरोधी मतदारांची नावे गायब करण्यासाठीचं हे सत्ताधाऱ्यांचं देश विरोधी षडयंत्र आहे.

एसआयआर ही वोट चोरीची योजना आहे. निवडणूक आयोग आता वोट चोरी षडयंत्राचा सक्रिय भागीदार बनला असून हा लोकशाही वरील हल्ला असल्याचा गंभीर आरोप, ठाकरे शिवसेनेचे महानगर



प्रमुख किरण काळे यांनी केला आहे. आपली नावे गायब होणार नाहीत या साठी मॅपिंग करून घेत मतदारांनी जागरूक रहावे, असे आवाहन काळे यांनी केले आहे. अहिल्यानगर शहरातील मतदारांची मतदार यादीतील नावे सुरक्षित व अबाधित राहण्यासाठी जनजागृती अभियान विरोधकांच्या वतीने सुरू करण्यात आले आहे. त्याच्या शुभारंभ प्रसंगी काळे बोलत होते. यावेळी संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, अनंत गारदे, रावजी नांगरे, पै. दीपक भोसले, सुशांत म्हस्के, प्रतीक बारसे, राम वाणी, राम झिने, प्रा. अमोल खाडे, रोहन शेलार, मतीन शेख, विकेश गुंदेचा, गणेश आपरे, शंकर आव्हाड, नलिनी गायकवाड, नीता बर्वे, अर्चना गायकवाड, शारदा वाघमारे, उषा भगत, शैला लांडे, रजनी ताठे, मीना रणशूर, रूपाली आपरे, लोकेश बर्वे, विजय शिरसाठ, चंद्रकांत उजागरे, जयराम आखाडे, विनोद शिरसाट, राम धोत्रे, सोनू देशमुख, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, निलेश लांडे, आप्पासाहेब लांडगे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ठाणे : दिनांक २०/०४/२०२६ रोजी पहाटे ५:४० वाजताच्या सुमारास ठाणे स्टेशन पॅराडाईज सोसायटी, मॅकडोनाल्ड जवळ, गावदेवी मंदिर जवळ, गोखले रोड, नौपाडा, ठाणे. (प.) या ठिकाणी पॅराडाईज सोसायटीच्या ( इमारत तळ + ९ मजली) तळमजल्यावरील असलेल्या प्राची फॅशन स्टोअर (तळ+१, मालक: श्री. चेतन बोरीचा, अंदाजे २५०० स्क्वेअर फुट) या दुकानामध्ये आग लागली होती. घटनास्थळी नगरसेवक संजय वाघुले सो., आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री. वाय. एम. तडवी सो., मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. गिरीश झळके सो., नौपाडा पोलीस कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान ०३- फायर वाहनासह २ वॉटर टँकर, ०१- रेस्क्यू वाहनासह, व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१- पिकअप वाहनासह, ०१- जेसीबी मशीनसह, महावितरण कर्मचारी,०१- ठा.म.पा. रुग्णवाहिका, ठा.म.पा. अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही.

## थोडक्यात बातम्या...



### परशुराम प्रतिष्ठानच्यावतीने श्री परशुराम याग संपन्न

अहिल्यानगर (स. गांवकरी) : श्री भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने श्री परशुराम यागाचे आयोजन केले होते. चितळेरोडवरील ऋग्वेद भवनात भव्य श्री परशुराम याग प्रधान आचार्य वे शा सं सिध्देश्वर निसळ यांच्या उपस्थितीत प्रमुख यजमान भगवान देशमुख आणि सौ. माधुरी देशमुख,संजय देशमुख आणि सौ अंजली देशमुख यांच्या हस्ते झाला. कौस्तुभ देशमुख आणि सौ प्रियंका देशमुख, अभिराम आणि सौ. आश्लेषा देशमुख,वरद आणि सौ पल्लवी जोशी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. या यागाची सांगता महाप्रसादाने झाली. यावेळी डॉ सतिश फाटके, डॉ सौ अंजली फाटके, हेमंत लोहगावकर,योगेश दाणी आदी मान्यवर उपस्थित होते. सुंदर रांगोळी कु. सायली कुलकर्णी हिने काढली होती. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रतिष्ठानचे श्रीया देशमुख,विजय देशपांडे, अनंत कुलकर्णी, अतूल शुक्ल अनिरुद्ध भहूरकर ,सार्थक भोंग,देवांग कुलकर्णी,ऋतु वैद्य, संकल्प उदास,सायली कुलकर्णी, स्वाती गटणे , कृतार्थ भोंग, अथर्व कुकडे, अथर्व देशपांडे, अबोली कुलकर्णी, दिपाली टाकळकर आदीनी परीश्रम घेतले. त्याचप्रमाणे उदया अक्षयतृतीयेनिमित्ताने भव्य मिरवणुक काढण्यात येणार आहे मिरवणुक प्रोफेसर कॉलनीतील रेणुका मातामंदिर पासून सुरू होउन भिस्तबाग अहिल्या चौकात महाआरती आणि प्रसादाने समारोप होईल तरी सर्व नगरकरांनी कार्यक्रमासाठी आवश्य येण्याचे करावे.

### जमिनीच्या वादातून सख्ख्या भावाकडून कुटुंबावर जीवघेणा हल्ला

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथे जमिनीच्या जुन्या वादातून सख्ख्या भावानेच भावाच्या कुटुंबावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी भगवान शंकर वीर (वय ४१, रा. बोधेगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी २०१० साली आपल्या मोठ्या भावाकडून २० गुंठे जमीन खरेदी केली होती. मात्र २०२४ मध्ये ही जमीन दुसऱ्या व्यक्तीस विकल्याचा राग मनात धरून आरोपींनी वाद घातला. ९ एप्रिल २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास, भगवान वीर हे कुटुंबासह घरी जेवत असताना आरोपींनी घरात घुसून शिवीगाळ केली व लोखंडी रॉड आणि लाकडी काठ्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात भगवान वीर यांच्या हाताला फ्रॅक्चर झाले असून डोक्यावरही मार लागला आहे. भांडण सोडवण्यासाठी पुढे आलेल्या त्यांच्या पत्नी सुरेखा आणि मुलगी आरती यांनाही आरोपींनी मारहाण केली. तसेच “जमीन परत दिली नाही तर जीवे मारू” अशी धमकी देऊन आरोपी तेथून पळून गेले. जखमींना तातडीने बोधेगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. या प्रकरणी विष्णू शंकर वीर, हर्षद विष्णू वीर व नंदा विष्णू वीर यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत. वरील आरोपींना अटक न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी भगवान वीर यांनी दिला.

### २१ रोजी सामुदायिक (उपनयन) मुंजी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षी प. पू. शंकराचार्य जयंती निमित्ताने सामुदायिक(उपनयन) मुंजीचा कार्यक्रम आयोजित केला जातो. यावर्षी दि.२१ एप्रिल २०२६ रोजी प. पू. शंकराचार्य जयंती असल्याने त्या दिवशी सार्वजनिक (उपनयन) मुंजीचा कार्यक्रम सनातन धर्मसभेच्या वतीने आयोजित केला आहे. इच्छुक बटू अथवा त्यांचे पालकांना सामुदायिक मुंजी कार्यक्रमात सहभाग घ्यावयाचा असल्यास संबंधितानी सायंकाळी ५ .३० ते ७. ३० या वेळेत धर्मसभेच्या कार्यालयास संपर्क साधावा किंवा वे. शां. स. पंडित चकोर गुरूजी ( ७०८३४५०५७१), वे. शां. स. निलेश धर्माधिकारी गुरूजी (९४२२२२०२३२) व वे. शां. स. उमेश वाळुंजकर गुरूजी (९९२२०७९१५२) यांच्या बरोबर संपर्क साधावा असे आवाहन अध्यक्ष वेदमुर्ती महेशजी रेखे,उपाध्यक्ष निळकंठ देशमुख, दिनकरराव देशमुख यांनी तसेच सर्व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

### शिक्षकांच्या बदल्यांना स्थगिती

अहिल्यानगर (स. गांवकरी) : आगामी ‘जनगणना २०२६’ साठी राज्य सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. जनगणनेचं राष्ट्रीय काम सुरळीत पार पाडण्यासाठी सरकारने राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या स्थगित केल्या आहेत. सर्व जिल्हा परिषदांमधील ‘गट-क’ आणि ‘गट-ड’ संवर्गातील कर्मचाऱ्यांसह शिक्षकांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना स्थगिती देण्यात आली आहे. यामुळे शिक्षकांचे टेन्शन वाढले आहे. शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामविकास विभागाने यासंदर्भातील अधिकृत परिपत्रक काढले आहे. यासह सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना हे पत्र पाठवले आहे. दरम्यान बदल्या स्थगिती करण्याच्या या निर्णयामागे केंद्र सरकारचे स्पष्ट निर्देश आहेत. केंद्रीय गृह सचिवांनी ११ मार्च २०२६ रोजी राज्य सरकारला पाठवलेल्या पत्रात जनगणनेच्या कामात शिक्षक, महसूल आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कर्मचाऱ्यांची भूमिका किती ‘निर्णायक’ असते.

# इस्कॉन नाशिक मंदिरात ‘चंदन यात्रा’ उत्सवाचा प्रारंभ

## ३०० किलो आंब्यांची मनमोहक आरास!



(स. गांवकरी)

द्वारका येथील श्री श्री राधा मदन गोपाल (इस्कॉन) मंदिरात अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर २१ दिवसीय 'चंदन यात्रे'ला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. यानिमित्त श्री श्री राधा मदन गोपाल यांच्या विग्रहांची ३०० किलो आंब्यांनी विशेष आरास करण्यात आली होती व पुढील २१ दिवस भगवंतांच्या सर्वांगाला चंदनाचा शीतल लेप लावला जाणार आहे. अक्षय्य तृतीया हा हिंदू संस्कृतीतील साडेतीन मुहूर्तांपैकी एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे. ही भगवान परशुरामांची जन्मतिथी असून, या दिवशी केलेल्या सत्कर्माचा कधीही 'क्षय' होत नाही. अक्षय्य तृतीयेनंतर उन्हाचा तडाखा वाढत असल्याने भगवंतांना थंडावा मिळावा, या उद्देशाने 'चंदन यात्रा' आणि 'नौका विहार' उत्सव साजरा करण्याची परंपरा वृंदावन व जगन्नाथ पुरी येथे जोपासली जाते व सोबतच जगभरातील इस्कॉन मंदिरांत देखील हे उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. नाशिकमध्येही यानिमित्त विविध पाने-फुले आणि ३०० किलो आंब्यांचा वापर करून मंदिराचे गर्भगृह व वेदी आकर्षकपणे सजवण्यात आली होती. या विशेष आरास दर्शनासाठी नाशिककर भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती. विशेष म्हणजे, सजावटीसाठी वापरण्यात आलेल्या ३०० किलो आंब्यांचे वाटप संध्याकाळी महाप्रसादाच्या स्वरूपात सर्व भाविकांना करण्यात आले.

या उत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे अबालवृद्ध भाविकांना स्वतःच्या हाताने भगवंतांसाठी चंदन उगाळण्याची सेवा करण्याची संधी मिळते. पुढील २१ दिवस श्री मदन गोपाल यांच्या उत्सव विग्रहांना आणि दर रविवारी मूळ (मोठ्या) विग्रहांना चंदनाचा लेप लावून विशेष शृंगार केला जाईल. दैनंदिन कार्यक्रम: पुढील २१ दिवस दररोज संध्याकाळी कीर्तन आणि महाप्रसाद वाटप. विशेष उत्सव : गुरुवार, दिनांक ३० एप्रिल रोजी 'नरसिंह चतुर्दशी' उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जाणार आहे. सर्व नाशिककर भाविकांनी या २१ दिवसीय धार्मिक उत्सवाचा आणि दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# डीएस ग्रुपची दूरचित्रवाणी जाहिरात सादर

(स. गांवकरी)




■ ही जाहिरात दूरचित्रवाणी आणि डिजिटल माध्यमांसह समाजमाध्यमे आणि ओटीटीवर प्रसारित होणार

अग्रगण्य वेगवान ग्राहक वस्तू (एफएमसीजी) समूह आणि बहुव्यवसायिक कॉर्पोरेशन असलेल्या धर्मपाल सत्यपाल समूह (डीएस ग्रुप) अंतर्गत लोकप्रिय ब्रँड कॅच सॉल्ट अँड स्पायसेसने कॅच प्रीमियम आयोडाइज्ड पिंक रॉक सॉल्टसाठी आपली पहिली वहिली दूरचित्रवाणी जाहिरात (टीव्हीसी) सादर केल्याची घोषणा केली आहे. डेंट्सू क्रिएटिव्ह वेबचटणी यांनी संकल्पित आणि निर्मित केलेली ही मोहीम डीएस समूहाच्या संवादाला मसाले आणि स्प्रिंकलर्स श्रेणीपलीकडे विस्तार देते. ही जाहिरात मीठ श्रेणीतील डीएस समूहाच्या उत्पादनाबाबत भक्कम जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली असून, ती दूरचित्रवाणी आणि डिजिटल माध्यमांसह समाजमाध्यमे आणि ओटीटीवर प्रसारित होणार आहे, ज्यामुळे लक्षित प्रेक्षकांपर्यंत व्यापक पोहोच सुनिश्चित होईल. ही जाहिरात शेजारच्या खेळाच्या मैदानातील हलक्याफुलक्या आणि आपुलकीच्या प्रसंगावर आधारित आहे.

# ७५ वर्षीय वृद्ध बेपत्ता; शोधासाठी नागरिकांना आवाहन!

ब्राम्हणवाडा : (स. गांवकरी)

ब्राम्हणवाडा (शिंदेवाडी) येथील एक वृद्ध व्यक्ती बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून यामुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अकोले पोलीस ठाण्यात याबाबत हरवलेल्या व्यक्तीची नोंद करण्यात आली आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मारुती रामचंद्र शिंदे (वय 75 वर्षे, रा. ब्राम्हणवाडा (शिंदेवाडी), ता. अकोले, जि. अहिल्यानगर हे दि. 14 एप्रिल 2026 रोजी दुपारी सुमारे 1.30 वाजण्याच्या सुमारास आपल्या घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेले असून तेव्हापासून बेपत्ता आहेत. सदर घटनेची माहिती संदिप गोपीनाथ फापाळे (वय 30, व्यवसाय – हॉटेल, मुळ रा. लिंगदेव, ता. अकोले, सध्या रा. ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे) यांनी पोलीसांना दिली आहे. बेपत्ता व्यक्तीचे वर्णन : मारुती शिंदे यांचा रंग सावळा असून उंची सुमारे 167 से.मी. आहे. शरीराने सडपातळ आहेत. ते डाव्या डोळ्याने आंधळे असून चष्मा लावतात. अंगात पांढऱ्या रंगाचा पायजमा व शर्ट, गळ्यात मफलर, डोक्यावर टोपी, पायात चप्पल आणि हातात काठी अशी त्यांची वेशभूषा होती. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस



हवालदार विजय गजानन खांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल देशमुख करत आहेत. पोलीसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, सदर वर्णनाची व्यक्ती कुठेही आढळल्यास त्वरित खालील संपर्क क्रमांकांवर माहिती द्यावी:

रामदास मारुती शिंदे:
9689933186
अनिकेत रामदास शिंदे:
7775859780
संदिप गोपीनाथ फापाळे:
9595605021

अकोले पोलीस ठाण्याच्या वतीने या वृद्धाचा शोध सुरू असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# टिटवाळ्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची उचलबांगडी



## ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. धोंडोपंत स्वामी यांची कारवाई

ठाणे ग्रामीण पोलीस दलात स्वतंत्र वाहतूक शाखाच नाही याबाबत दैनिक जनमत ने ३ मार्च २०२६ रोजी परखड वृत्त लिहून ११ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाहतूक पोलिसांची व्यथा मांडली होती. वाहतूक विभाग नसल्याने पोलीस ठाण्यातील कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना वाहतूक व्यवस्थेकडे लक्ष घालावे लागते. तर याबाबत टिटवाळ्यातील वकील जितेंद्र जोशी यांनीही राज्याचे गुराज्यमंत्री योगेश कदम तसेच पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्याकडे ठाणे ग्रामीण पोलीस दलात वाहतूक शाखेची निर्मिती करण्याबाबतची लेखी पत्राद्वारे मागणी प्रत्यक्ष भेटून केलेली होती. तसेच याबाबत पोलीस अधीक्षक डॉ.धोंडोपंत स्वामी यांच्याशी भेट घेऊन पोलीस कर्मचाऱ्यांची व्यथा मांडली होती. सदर अपघाताला दोषी ठरवून बदलीकरण्यात आलेल्या त्या पोलीस निरीक्षकांची काहीही चूक नसून त्यांच्या बदल्यात आरटीओ विभाग,हायवे वाहतूक पोलीस यांच्यावर कारवाई व्हायला हवी होती असे नागरिकांतून बोलले जात आहे.

टिटवाळा : (स. गांवकरी)

कल्याण-मुरबाड महामार्गावरील रायते येथील पुलावर झालेल्या भीषण अपघातात ११ निष्पाप नागरिकांचा जीव गेला होता याबाबत ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ.धोंडोपंत स्वामी यांनी या प्रकरणात कल्याण तालुका पोलीस

ठाण्यात नेमणुकीस असलेल्या दोन्ही वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची उचलबांगडी केली आहे. त्यांच्या जागी शहापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांच्याकडे टिटवाळा पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. टिटवाळा पोलिस ठाण्याचा कारभार काही महिन्यांपूर्वी 'सिंघम' म्हणून नावाजलेले पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांनी स्विकारला होता. पदभार स्वीकारल्यानंतर पंकज गिरी यांनी परिसरात वाढत चाललेली गुन्हेगारी नियंत्रणात आणण्याचे यशस्वी प्रयत्न केले. मात्र अति कामाच्या ताणामुळे त्यांची प्रकृती बिघडली होती. त्यांच्यावर टिटवाळ्यातील श्री.महागणपती इस्पितळात उपचार केल्यावर पुन्हा ते आपल्या कर्तव्यावर हजर झाले होते. पण लागलीच थोड्याच दिवसांत त्यांना पुन्हा अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांनी वैद्यकीय रजा घेऊन मुंबईच्या हिंदुजा इस्पितळात उपचार घेतले होते.

त्यांच्या जागी मुरबाड येथील पोलीस निरीक्षक दादासाहेब एडके यांनी तात्पुरता पदभार स्वीकारला होता. आणि त्याच काळात रायते पुलावर काळी पिवळी ओम्नी गाडी आणि सिमेंट मिक्सर यांचा अपघात होऊन त्यात निष्पाप ११ जणांचा बळी गेला होता. ओम्नी गाडीत क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी भरल्याचा तसेच गाडीचा अति वेगामुळे ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात भीषण अपघात झाला होता. याला जबाबदार धरून ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ.धोंडोपंत स्वामी यांनी दोन्ही वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची उचलबांगडी केली.

# अवैध वीट भट्ट्या बंद करण्यासाठी छावा क्रांतिवीर सेनेचा निर्णायक लढा

शिर्डी : (स. गांवकरी)

छावा क्रांतिवीर सेना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मौजे पिंपळवाडी येथील नागरिकांच्या विविध ज्वलंत व दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नांसंदर्भात जाहीर करण्यात आलेले बेमुदत आमरण उपोषण आजपासून प्रत्यक्षात सुरू झाले आहे. प्रशासनाविरोधातील तीव्र असंतोष दिवसेंदिवस उफाळून येत असून,वेळोवेळी निवेदन देऊनही प्रशासनाने केलेले सातत्यपूर्ण दुर्लक्ष,तसेच वीट भट्ट्या व्यावसायिकांकडून शासनाच्या आदेशांना उघडपणे न जुमानता दाखवलेली बेफिकीरी—या सर्वांचा निषेध म्हणून संघटनेने हा निर्णायक लढा उभारला आहे. या उपोषणाचे नेतृत्व अहिल्यानगर जिल्हा



प्रमुख श्री. अविनाश अशोक शिंदे करत असून,स्थानिक नागरिकांचे हक्क,त्यांच्या आरोग्याचे संरक्षण आणि न्याय मिळवून देण्यासाठी हा संघर्ष उभारण्यात आला आहे. अनेक वेळा निवेदनं देऊन, सातत्याने पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस व प्रभावी कार्यवाही न झाल्याने अखेर हा टोकाचा निर्णय घ्यावा लागल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. पिंपळवाडी परिसरात वीट भट्ट्यांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूप धारण करत आहे. भट्ट्यांमधून निघणारा धूर, उडणारी धूळ आणि वाढत चाललेले अस्वच्छ वातावरण यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. श्वसनाचे विकार,डोळ्यांचे आजार आणि इतर विविध आजार वाढीस लागले असून, याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या पिकांवर होऊन शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. याशिवाय,वीट भट्ट्यांवर बालमजुरीसारखा अत्यंत गंभीर आणि संवेदनशील मुद्दा समोर आला आहे.केवळ १५ वर्षांच्या बालमजुराच्या मृत्यूची घटना अत्यंत धक्कादायक असूनही, संबंधितांवर अद्याप कोणतीही कठोर कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे संतापाची तीव्र लाट उसळली असून,शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे संघटनेने हा आमरण उपोषणाचा निर्णय घेतला आहे.

आंदोलनाच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :

- २६ जानेवारी रोजी ग्रामसभेत मंजूर झालेल्या ठरावाची तात्काळ अंमलबजावणी करावी.
- बालमजुराच्या मृत्यूप्रकरणी संबंधितांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.
- वीट भट्ट्यांमुळे होणारे प्रदूषण तातडीने थांबवावे.
- बालमजुरी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना राबवून व्यापक सर्वेक्षण करून दोषींवर कारवाई करावी.
- या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.
- गावातील सर्व वीट भट्ट्यांचा पंचनामा करून त्या शासन ताब्यात घ्याव्यात.
- ग्रामसभेच्या ठरावाला न जुमानणाऱ्या संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.

छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी स्पष्ट व कडक इशारा दिला आहे की, वरील सर्व मागण्यांवर शासनाकडून ठोस आणि लेखी निर्णय घेतला जात नाही तोपर्यंत जिल्हाध्यक्ष अविनाश शिंदे व इतर पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले हे आमरण उपोषण कोणत्याही परिस्थितीत मागे घेतले जाणार नाही.आवश्यकतेनुसार महाराष्ट्रभरातील सर्व पदाधिकारी आंदोलनस्थळी दाखल होऊन हा लढा अधिक तीव्र करतील,आणि त्या परिणामी निर्माण होणाऱ्या सर्व परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी शासन व प्रशासनावर राहील.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)